FLUX ELECTRONICA INDIA PRIVATE LIMITED

AN ISO 9001:2015 Certified Company

Address: Office No.08, 1st Floor, Chaitanya Industrial Estate, Manajainagar, Narhe, Pune-411041, Maharashtra, INDIA.

Contact:+91 7784849797 / +91 7784849898

Email: contact@fluxelectronica.com | Web: www.fluxelectronica.com

स्वयंम थ्री फेज डिजिटल STAR-DELTA स्टार्टर



भारत हा कृषीप्रधान देश आहे. शेतकरी या देशाचा आर्थिक कणा. सगळ्या देशाच्या पोटाची भूक मिटवण्यासाठी शेतकरी अहोरात्र कष्ट करत असतो. मात्र असे असलेतरी शेती हा बिन भरवश्याचा व्यवसाय झाला आहे. त्यामुळे आपल्याकडे असणाऱ्या मबुलक पाण्याचे नियोजन व्यवस्थित करून शेतकरी राजाला शेती करावी लागते.कारण पाण्याची उपलब्धता असली तरी ग्रामीण भागात तासंतास लोडशेडिंग असते. विजेच्या अनियमिततेमुळे रात्री अपरात्री शेतकरी राजाला शेताला पाणी देण्यासाठी जावे लागते. मोटार चालू व बंद करण्यासाठी सतत हेलपाटे घालावे लागतात. साप, विंचू ,माकडे, रानडुकरे ,बिबट्या अशा हिंस्र प्राण्यांच्या भितीपोटी जीव मुठीत घेऊन रात्री घराबाहेर पडावे लागते. दरवर्षी कित्येक तरी शेतकरी बांधव हिंस्र प्राण्यांच्या हल्लात जखमी होतात. रात्रीच्या अंधारात विजेचा शॉक लागुन जिवाला मुकतात.

यासाठी बळीराज्याच्या सुरक्षिततेसाठी,त्यांचे कष्ट कमी करून स्मार्ट शेती करण्यासाठी FLUX ELECTRONICA INDIA PRIVATE LIMITED ने मेक इन इंडिया व आत्मनिर्भर भारत अभियाना अंतर्गत स्वयंम डिजिटल मोबाईल ऑटो तंत्रज्ञान विकसित केले आहे. या माध्यमातून शेतकरी राजा आणि त्याच्या कुटुंबातील सदस्य घरबसल्या शेतातील मोटर कधीही कॉल व मेसेज द्वारे नियंत्रीत करू शकता.

यामुळे शेतकरी राजाचे कष्ट वाचून त्यांना नक्कीच दिलासा मिळेल याची आम्हाला खात्री आहे.

- **<u>वैशिष्ट्ये :</u>**

१) फेज फॉल्ट ,फेज रिव्हर्स ,फेज मधील असमतोल व इतर तांत्रिक अडचणी असल्यास मोटर तात्काळ बंद केली जाते.
२) 3 CT कॉईलमुळे तंतोतंत ड्रायरन सुविधा तसेच ड्रायरन नंतर ऑटोमॅटिक मोटर चालू करण्याची टायमर सुविधा .
३) डिजिटल डिस्प्लेवर व्होल्टेज,करंट, तांत्रिक फॉल्ट असल्यास दाखवतो.
४) आपण सेट केलेल्या वेळेनुसार मोटर ऑटोमॅटिक चालू व बंद करता येते.
५) स्टार्टर चा ON DELAY टाईम सेट करता येतो.
६) मोटर ला काही फॉल्ट झाल्यास उदा.फुटबॉल गाळात फसणे,मोटर बेअरिंग जाम होणे,
१ कॉइल जास्त करंट घेणे, व्होल्टेज जास्त-कमीमुळे कॉन्टॅक्टर जॅम होणे,मोटरची वायर अथवा स्टार्टरचे कनेक्शन व्यवस्थित न झाल्यास मोटर तात्काळ बंद होते.
७) डीपी फेज किंवा स्टार्टर फेज फॉल्ट झाल्यास मोटरला बंद करून संरक्षण मिळते.
८)२४ तास ग्राहक सुविधा.

- **<u>मोबाइल ऑटो स्टार्टरला जोडताना घ्यावयाची काळजी:</u>**

१) स्टार्टरचा मुख्य पुरवठा बंद करणे.

- स्टार्टर साठीची जोडणी प्रकिया:

१) मेन सप्लाय च्या लाल वायर **L1** ,पिवळी वायर **L2**,निळी वायर **L3** या पॉईंट ला लावणे
२)मोटरच्या पहिल्या तीन लाल वायर **M1** ,पिवळी वायर **M2**,निळी वायर **M3** या पॉईंट ला व दुसऱ्या तीन लाल वायर **M4** ,पिवळी वायर **M5**,निळी वायर **M6** या पॉईंट ला लावणे

स्वयम TM
कृषी तंत्रज्ञान
आधुनिक तंत्रज्ञान वापरूया,
आपली व मोटारीची सुरक्षितता जपुया ....



CERTIFIED ISO 9001:2015 COMPANY

CE

RoHS compliant